


साप्ताहिक www.dongarcharaja.com वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा


संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ११ ■ अंक ३ ■ बुधवार, दि. ३० जुलै २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# ताई..तुम्ही ओटीत घेतलेला दत्तक पुत्र बेवारस केला...







## दोन दादांच्या उपस्थितीत... शक्तीप्रदर्शन करत होणार प्रवेश!

युवा नेते बाबरी मुंडे यांनी आपल्या संघटन कौशल्याच्या जोरावर मोठा जनाधार वडवणीसह धारुर, माजलगाव तालुक्यात मिळवलेला आहे... आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचे निश्चित केले आहे. वडवणी येथे जाहीर सभा घेवून शक्ती प्रदर्शन करत व दोन्ही दादांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश करण्याचा मानस बाबरी मुंडे यांचा आहे... राजाभाऊ मुंडे यांनी देखील तसे संकेत दिले आहेत परंतु काही कारणास्तव जाहीर सभेचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला तर मुंबईत देखील मोठे शक्ती प्रदर्शन करत हा प्रवेश होणार आहे.

डोंगरचा राजा विशेष वृत्त..

वडवणी येथील सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बाबरी मुंडे हा माझा दत्तक पुत्र आहे. असे जाहीर केले होते. मात्र हा दत्तक घेतलेला पुत्र आता तुम्ही बेवारस केला.अशा प्रतिक्रिया शहर आणि तालुक्यातील जनमानसात उमटु लागल्या आहेत.

मागील काही वर्षात वडवणी शहरांमध्ये ठिकठिकाणी १०० ते २०० जेसीबी उभारून मंत्री पंकजाताई मुंडे यांचे फुलांची उधळण करीत न विसरण्याजोग भव्य स्वागत केलं होतं. त्या अतिउत्साही कार्यक्रमांमध्ये वडवणी तालुक्यातील सर्व गावचे कार्यकर्ते वाड्यावर त्यावरील जेष्ठ मंडळी सहभागी झाले होते. सत्कार समारंभ पार पडल्यानंतर आपण दोन शब्द बोलावे असा आग्रह झाला. आपण दौऱ्यात असताना ठिकठिकाणी आपलं स्वागत केलं गेलं. निश्चितच दौऱ्याच्या प्रसंगी आपल्यावर जी चाहत्यांनी फुलांची उधळण करत आपलं स्वागत केले. यावरुन

आपण अतिशय आनंदी आणि हर्षोल्लासीत झाल्या होत्या. वडवणी शहर आणि तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी सुध्दा ठिकठिकाणी आपला फौजफाटा सोबत घेऊन स्वागतासाठी सज्ज झाले होते. बाबरी मुंडे..हे नाव तुम्हाला आज आता ऐकावसं वाटत नसलं तरी सुद्धा ऐकावयास मिळत आहे. कारण वडवणी मार्गावरील आपल्या प्रत्येक दौऱ्यात या ठिकाणी थोडा विसावा घ्यावाच लागतो हे सर्वश्रुत आहे. मागील काही महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणुकीच्या कारणास्तव या बाबरी मुंडे ना तुम्ही बाजूला सारले. आता काही महिन्यांत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका होऊ घातल्या आहेत. वरिष्ठांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याने बाबरी मुंडेना पर्याय शोधणे गरजेचे होते. म्हणूनच माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. त्या अनुषंगाने बाबरी मुंडे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उद्या मुंबईत भेट घेऊन तारीख वेळ ठरवून एक मोठा कार्यक्रम घेणार आहेत. वडवणी तालुक्यातील १० ते १२ ग्रामपंचायत चे सरपंच व सर्वपरिचित युवक अन्? जेष्ठ कार्यकर्ते प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## आ.सोळंकेंवर काही कार्यकर्ते नाराज

गेल्या अनेक वर्षांपासून बाबरी मुंडे यांच्यापासून अलिप्त झालेले अनेक कार्यकर्ते आता बाबरी मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात येत असल्याने नाराजीचा सूर व्यक्त करू लागले आहेत. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व काही सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करत आलो आहोत. मात्र गेल्या काही दिवसापासून बाबरी मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत आ.प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश करणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर हेच कार्यकर्ते आता या पक्ष प्रवेश नाट्यामुळे आ.प्रकाश सोळंके यांच्या बद्दल नाराजी व्यक्त करु लागले आहेत.



# मोहनराव जगताप यांनी चिखलबीड येथे दिली भेट

शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे, महादेव जमाले पाटील यांची कुस्तीच्या आखाड्यात हजेरी

चिखलबीड:प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांनी नुकतीच डोंगर पट्ट्यात असलेल्या चिखलबीड येथे भेट देऊन कुस्ती स्पर्धेत विजयी पैलवानांचे कौतुक केले.त्याचबरोबर शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष महादेव जमाले पाटील यांनी कुस्तीच्या आखाड्यातही हजेरी लावली असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर राजकीय चर्चा झाली.

वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथे नागपंचमी निमित्त भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे नेते मोहनराव जगताप यांच्या हस्ते कुस्ती लाऊन या फडाचे उद्घाटन करण्यात आले.

### आगामी काळात राजकीय कुस्त्या

येत्या काही दिवसात जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूका होणार असून त्यामध्ये देखील सर्कलनिहाय कुस्त्या लावल्या जाणार आहेत!

यावेळी शिवसेना वडवणी तालुका प्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष महादेव जमाले, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष ईश्वर तांबडे, सरपंच विलास वडणे, जेष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव, युवराज शिंदे, सुग्रीव मुंडे, युवासेनेचे नवनाथ मोरे, नाना मोरे, अशोक गोंडे,सरपंच संजय धपाटे, वैजनाथ देशमुख,अंकुर गोंडे,अविनाश बोंद्रे, अजय खांडवे, सह आदींची उपस्थिती होती.



## संपादकीय

# आव्हान कायम

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याचे वादग्रस्त धोरण रद्द करून याबाबत डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती नेमल्यानंतरही याबाबत अधून मधून राजकीय वक्तव्ये होत असल्याने हा विषय पुरता थांबलेला नाही. मात्र, तिसरी ते दहावी या इयत्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मसुद्यात तिसऱ्या भाषेचा उल्लेख नसल्याने तो आता थांबायला हरकत नाही.

हिंदीच्या सक्तीवरून शैक्षणिकच नव्हे, तर राजकीय वातावरणही ढवळले होते; त्यामुळे हा मुद्दा या मसुद्यात नसणे स्वाभाविक म्हणायला हवे. डॉ. जाधव यांच्या समितीच्या शिफारशी येईपर्यंत आणि त्यावर सरकारचा निर्णय होईपर्यंत याबाबत विद्यमान पद्धत कायम ठेवण्याचे धोरण रास्त आहे. 'एनईपी'च्या मसुद्यातील भाषा, त्यातील शिक्षणविषयक चिंतन आणि काळानुरूप विद्यार्थी घडविण्याबाबतची कळकळ यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासारखे काहीही नाही. राज्यघटनेची आणि शिक्षण हक्क कायद्याची चौकट न मोडता सर्वांपर्यंत दर्जेदार शिक्षण नेणे हे खरे आव्हान आहे. अभ्यासक्रम नवीन येणार असला, तरी हे आव्हान जुनेच आहे. त्यामुळे 'एनईपी'त असलेल्या दोषांवर, विशेषत: शाळा संकुलांसारख्या किंवा भारतीय ज्ञानपरंपरेच्या नावाखाली काहीही शिकविण्यासारख्या मुद्द्यावर आणि एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणाला देण्यासाठी कटिबद्धता न दाखविण्यावर जाणकार बोट ठेवत आले आहेत. हे दोष दूर करून 'एनईपी' कशा पद्धतीने राबविले जाते, हे महत्त्वाचे आहे.

प्रस्तावित अभ्यासक्रम मसुद्यात सहावीपासून व्यावसायिक शिक्षण हा विषय स्वतंत्रपणे येईल. विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच विविध व्यवसायांचे आणि कौशल्यांचे शिक्षण देण्याबाबत दुमत असण्याचा प्रश्नच नाही. यापूर्वीच्या विविध शैक्षणिक धोरणांत हा मुद्दा येऊन गेला आहे. शालेय शिक्षणातही कार्यानुभवाचा समावेश पूर्वीपासून आहे. मात्र, दुर्दैवाने आपल्याकडे शालेय स्तरावर अशा विषयांना फारसे महत्त्व दिले जात नाही. आपली मुले ही भाषा, गणित, विज्ञान, समाजविज्ञान विषयांत प्रवीण व्हावीत, अशी बहुतेक पालकांची अपेक्षा असते. कार्यानुभव किंवा व्यावसायिक शिक्षण यांबाबत ते उदासीन असतात. म्हणून अनेक शाळांमध्ये या विषयांचे शिक्षण केवळ कागदोपत्री होते; त्यांच्यासाठीच्या तासिका गणित किंवा अन्य विषयांसाठी वापरल्या जातात, असाही अनुभव आहे. त्यामुळे आता नव्याने सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाचा समावेश केला गेला असला, तरी त्याच्या अंतिम फलनिष्पत्तीबाबत साशंकता आहे. हे विषय केवळ कागदोपत्री न राहता, प्रत्यक्षात घेतले जावेत, त्यांसाठीची प्रात्यक्षिके होतील आणि विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकता येईल असे वातावरण निर्माण व्हायला हवे. यांबाबत शिक्षकांची आणि पालकांचीही मानसिकता बदलायला हवी. तरच व्यावसायिक शिक्षण परिणामकारक होईल; अन्यथा ते कुचकामी ठरेल.

भारतीय ज्ञानप्रणाली, मूल्ये आणि स्वभाववृत्ती यांचा उल्लेख मसुद्यात असून, त्यांचा एकात्मिक स्वरूपात विचार करण्यात आला आहे. भारतीय ज्ञानपरंपरांच्या शिक्षणाबाबत घेतले जात असलेले आक्षेप दूर केल्यास आणि हा विषयही वेळापत्रकानुसार शिकविल्यास उपयुक्त ठरेल. तिसरी ते पाचवी या इयत्तांसाठीचा 'परिसर अभ्यास' हा प्रामुख्याने विज्ञान, इतिहास आणि भूगोल यांच्याशी संबंधित विषय आता 'आपल्या सभोवतालचे जग' या नावाने शिकविला जाईल. हा केवळ नावातील बदल राहणार नाही, हे पहावे लागेल. जिल्हा, राज्य आणि देश या क्रमाने इतिहासाचे शिक्षण असेल हे सांगताना चौथीसाठी सध्या असलेले 'शिवछत्रपती' हे पाठ्यपुस्तक आहे तसे चालू ठेवण्याची भूमिका रास्तच म्हणावी लागेल.

नववी आणि दहावी या इयत्तांसाठी अनुक्रमे समाजातील व्यक्ती आणि पर्यावरण शिक्षण हे पाठ्यक्रम स्वतंत्रपणे तयार करण्यात आले आहेत. संरक्षणशास्त्र, समाजसेवा, वाहतूक सुरक्षा आणि संरक्षण अशा अन्य विषयांचा उल्लेखही आहे. हे सर्व विषय महत्त्वाचे असले, तरी योग्य प्रमाणात आणि परिणामकारतेने ते शिकवायला हवेत. या मसुद्यावर येणाऱ्या सूचनांचा स्वीकार करून, आवश्यक ते बदल करून अभ्यासक्रम प्रत्यक्षात येईल, हे पाहायला हवे.

# स्वरा पेट्रोलियमचा भव्य शुभारंभ संपन्न

घाटसावळी/प्रतिनिधी

वडवणी येथील नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष श्री बन्सीभाऊ मुंडे, इंद्रमोहन मुंडे व श्रीमंत मुंडे या त्रिमूर्तींनी बीड परळी हायवे रोडवर घाटसावळी जवळ स्वरा पेट्रोलियम या नवीन व्यवसायाची सुरुवात केली. या व्यवसायाचा शुभारंभ ह.भ. प. शांतीब्रह्म नवनाथ महाराज श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

याबाबत अधिक वृत्त असे की,वडवणी येथील नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष श्री बन्सीभाऊ मुंडे, इंद्रमोहन मुंडे व श्रीमंत मुंडे यांनी पेट्रोलियम क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकले असुन घाटसावळी येथे एक भरगच्च कार्यक्रम घेऊन या पेट्रोल पंपाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमासाठी माजी आमदार केशवराव आंधळे, वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप, भाजपचे नेते सोमनाथ बडे, युवा नेते भारत जगताप, युवा नेते बाबरी मुंडे, एमएम आरडीए संचालक माधव नागरगोजे, बाबासाहेब मुंडे महाराज, आंधळे महाराज, युवा नेते दादासाहेब मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य



नवनाथराव म्हेत्रे, सर्जेराव महाराज आळणे, नगरसेवक नागेश आळणे, युवा नेते मुन्ना फड, युवा नेते अमोल आंधळे, युवा नेते बप्पासाहेब घुगे,बबनराव आंधळे, दत्तात्रय डोईफोडे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष ईश्वर तांबडे, सभापती संभाजी शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे, माजी नगरसेवक आत्माराम जमाले, युवा नेते संजय आंधळे,

रामप्रसाद फड, बबनराव लांडे, डॉ.पुर्भे,डॉ.संजय मस्के , भाजपचे तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, माजी सरपंच विकास मुंडे, माजी तालुकाध्यक्ष सुरेश भोरे,

डॉ.टकले, डॉ.बोंगाणे,डॉ.हंगे, डॉ.खोटे,गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, जेष्ठ नेते सर्जेराव काळे,जेष्ठ नेते गुलाबराव राऊत, उद्योजक विजयकुमार आंडील, आण्णा महाराज दुटाळ,विठ्ठल महाराज आंधळे, नगरसेवक विनय नहार,जेष्ठ नेते सोमनाथ माने, गोवर्धन दराडे सर,अंकुशराव पेशवे,माजी प्राचार्य डी डी राऊत, अंकुशराव शिंदे,ॲड.आंधळे,ॲड.शेख ताजोद्दीन, बालाजी चाटे,सुग्रीव मुंडे, बिभीषण आंधळे, दादासाहेब जाधवर सह

पंचक्रोशीतील सरपंच, चेअरमन व प्रतिष्ठित व्यापारी, व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या सर्व सन्माननीय मान्यवर मंडळी यांचा यथोचित सन्मान सत्कार आयोजकांकडून करण्यात आला. कार्यक्रमात माजी आमदार केशवराव आंधळे, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, युवा नेते दादासाहेब मुंडे, आयुक्त नागरगोजे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनी तर आभार श्रीमंत मुंडे सह आदींनी व्यक्त केले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांचा विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा

वडवणी: प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचा संयुक्त वाढदिवस वडवणी शहरांमध्ये धनराज मुंडे मित्र मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील व तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्राचे लाडके देवा भाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस धनराज मुंडे मित्रमंडळाच्या वतीने वडवणी मध्ये वृक्षरोपण, शालेय साहित्य वाटप करून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कुठल्याही फटाक्याची आतशबाजी न करता व बॅनर बाजी न करता पर्यावरण पूरक असा वाढदिवस धनराज मुंडे मित्र मंडळांनी साजरा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारे साजरा करण्यात आला मात्र वडवणी मध्ये धनराज मुंडे यांनी खर्चाला फाटा



देत कुठलेही आतश बाजी न करता वृक्षारोपण केले, विद्यार्थ्यांना फळे वाटप केले, व शालेय साहित्याचे वाटप केले असा वाढदिवस धनराज मुंडे यांनी वडवणी शहरांमध्ये साजरा केला यावेळी माजी नगरसेवक सह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धनराज मुंडे यांना मुख्यमंत्र्यांच्या शुभेच्छा

दुसऱ्या दिवशी धनराज मुंडे यांचा वाढदिवस होता त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी धनराज राजेभाऊ मुंडे यांना मेसेज करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी धनराज मुंडे यांनी सांगितले की धन्यवाद साहेब आपल्या शुभेच्छा मला नेहमी चांगलं काम करण्याची प्रेरणा देत राहतील.



**ॲड.तुकाराम आडे यांच्या वाढदिवसानिमित्त यथोचित सत्कार करुन शुभेच्छा देताना युवा नेते अशोकराव गोंडे सह आदी दिसत आहेत.**

# टीम मुंबईचा परिषदेच्या कार्यालयात एस.एम.देशमुख यांच्या हस्ते सत्कार

मुंबई : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा २ जुलै रोजी झालेला पुरस्कार वितरण सोहळा यशस्वी केल्याबद्दल आज एस.एम.देशमुख यांच्या हस्ते राजा आदाटे यांच्या नेतृत्वाखालील ''टीम मुंबई'' चा परिषदेच्या कार्यालयात सत्कार करण्यात आला.. यावेळी परिषदेच्या मुंबई शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते..

२ जुलैचा पुरस्कार वितरण सोहळा अविस्मरणीय झाला.. यामागे मुंबई टीमचे टीमवर्क, नियोजन आणि जिद्द दिसून आली.. त्यातूनच सोहळा




सर्वांच्या स्मरणात राहील असा झाला.. त्याबद्दल मुंबई टीम अभिनंदनास पात्र असल्याची भावना एस.एम.देशमुख यांनी बोलून दाखविली...हीच एकजूट आणि संस्थेबद्दलची आत्मियता भविष्यातही कायम ठेवावी अशी अपेक्षा देशमुख यांनी व्यक्त केली..

यावेळी अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनीही सर्वांचे अभिनंदन केले..

विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे उपस्थित होते..

अध्यक्ष राजा आदाटे, विभागीय सचिव दीपक कैतके, परिषदेचे उपाध्यक्ष विशाल परदेशी, जिल्हा शाखेचे कोषाध्यक्ष पांडुरंग म्हस्के, दीपक पवार, सुरेश गायकवाड, सुरेश ढेरे आदिंचा यावेळी सत्कार करण्यात आला..

सत्काराच्या कार्यक्रमानंतर परिषदेच्या कोअर कमिटीची बैठक झाली.. त्यात विविध विषयांवर चर्चा होऊन महत्वाचे निर्णय घेण्यात आले..

# शाळेच्या सर्वांगिण विकासात शाळा व्यवस्थापन समितीची मुख्य भूमिका:सुनिल मुंडे

वडवणी:प्रतिनिधी

कोणत्याही शाळेची शाळा व्यवस्थापन समिती ही शाळा आणि समुदायामधील एक महत्त्वाची समन्वयक आणि सल्लागार संस्था आहे. ही समिती शाळांच्या विकासासाठी, शैक्षणिक गुणवत्तेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी काम करते. आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी व शाळेच्या सर्वांगिण विकासासाठी या समितीने जबाबदारीपूर्वक कार्यरत असणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांनी चिंचवण केंद्रातील पहिल्या शिक्षण परिषदेत शिक्षकांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केले.

वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलबीड याठिकाणी चिंचवण केंद्राची पहिली शिक्षण परिषद नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन



अभिवादन करण्यात आले. या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे सर उपस्थित होते तर प्रमुख पाहूणे म्हणून चिखलबीड शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी, सर्व घटक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. यावेळी सुलभक म्हणून लाभलेले श्रीकृष्ण उंडाळे सर यांनी मूल्यवर्धन या विषयावर मार्गदर्शन केले, त्यानंतर संदिप देशपांडे सर यांनी शाळा व्यवस्थापन समितीची कार्य व जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले तर श्रीधर नांदवटे सर यांनी पॅट परिक्षा या विषयावर मार्गदर्शन केले.

अशा आपापल्या घटकांनुसार सर्वांना अत्यंत दर्जेदार व उपयुक्त असे सविस्तर मार्गदर्शन उपस्थित शिक्षक बांधवांना केले. तसेच अध्यक्षीय समारोपात सुनिल मुंडे सर यांनी सर्व विविध विषयांवर आढावा घेतला व त्या संदर्भात सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी पुढे बोलतांना ते म्हणाले की, शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पालकांना शाळेच्या कामकाजात सक्रियपणे सहभागी होण्याची संधी मिळते. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेण्यास मदत होते. शालेय समस्यांवर प्रभावीपणे उपाययोजना करता येतात. समुदायाचा शाळेच्या विकासात सक्रिय सहभाग होतो. शाळेतील शैक्षणिक वातावरण सुधारण्यास मदत होते. शाळा व्यवस्थापन समिती ही एक महत्त्वाची संस्था आहे, जी शाळा, विद्यार्थी आणि समुदायाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माधव दुधाळकर सर यांनी केले. प्रास्ताविक माने सर यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार नांदवटे सर यांनी मानले. या मासिक शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलबीड शाळेचे माने सर, नांदवटे सर, आनेराव सर, खेत्रे सर, गायकवाड सर, दुधाळकर सर, मस्के मॅडम, खेत्री मॅडम या सर्वांनी परिश्रम घेतले. अत्यंत उत्साही वातावरणात चिंचवण केंद्राची ही पहिली मासिक शिक्षण परिषद संपन्न झाली.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताह

बीड :प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या २७ व्या पुण्यमारणार्थी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजन ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी आरंभ होणार आहे.दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी दीप प्रज्वलन ह.भ.प. महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प गोपाळ म. शास्त्री पोखरी, ह.भ.प उद्धव म. चोले खडकी, कलश पूजन ह.भ.प महादेव महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी, ह.भ.प महादेव महाराज राऊत जवळा, ह.भ.प. भागवत म. पुरी श्री क्षेत्र पंचमुखेश्वर भाटेपुरी, गुरूची प्रतिमा पूजन: ह.भ.प शांतीब्रम्ह माठाधिपती नवनाथ बाबा महाराज, गाथा पूजन, ज्ञानेश्वरी पूजन, टाक पूजन, विना पूजन, मृदुंग पूजन, हार्मोनियम पूजन हे होईल. या नंतर फुल टाकण्याचा कार्यक्रम होऊन व्यासपीठ पूजन होईल. अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होईल. दि. ०२ऑगस्ट शनिवार रोजी रात्री ०९ ते ११वा. या वेळेत ह.भ.प समाजप्रबोधनकार निवृत्ती म. इंदोरीकर यांचे कीर्तन दि. ०३ ऑगस्ट रविवार रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज सांगळे यांचे कीर्तन, दि ०४ सोमवार रोजी ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे, ०५ मंगळवार सचिन महाराज ढोले, दि ०६ बुधवार ह.भ.प. विशाल महाराज खोले, दि. ०७ गुरुवार रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज पाटील, दि.०८ शुक्रवार रोजी ह.भ.प.विश्वनाथ महाराज वारिंगे कोकणरत्न यांचे कीर्तन सेवा होणार आहे. दि. ०९ शनिवार रोजी १२ ते ०२ वा. ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर, रामायणाचार्य बुलढाणा विदर्भ यांचे काल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.३० जुलै २०२५ । पान ३

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०४ ऑगस्टला

बीडः जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.





# ना.पंकजाताई मुंडे या राजकारणातील झुंजार नेतृत्वाचं प्रतीक:संजय आंधळे

## शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाने मंत्री पंकजा मुंडेंचा वाढदिवस साजरा

वडवणी : प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे हे नाव केवळ राजकारणापुरतं मर्यादित नाही, तर ते एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचा प्रतीक आहे. त्यांचा वाढदिवस उपक्रमशीलतेने साजरा होणं, ही त्यांच्या कार्याचीच पुढची पायरी असल्याचे मत वडवणी तालुका भाजपचे नेते संजय आंधळे यांनी शैक्षणिक व पर्यावरण सप्ताहाच्या प्रारंभ प्रसंगी मत व्यक्त केले

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील चिंचोटी, हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, सोन्नाखोटा, खाडेवाडी, डोंगरेवाडी, जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. पुढील सात दिवस शैक्षणिक, पर्यावरण सप्ताह चालणार असून याचा प्रारंभ मोठ्या उत्साहाने करण्यात आला आहे. पुढे बोलताना भाजपचे नेते संजय आंधळे म्हणाले की,

ना. पंकजाताई मुंडे या एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची हीच प्रेरणा घेऊन वडवणी तालुक्यात त्यांचा वाढदिवस सामाजिक भान जपणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली १५ वर्षे सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून प्लॉस्टिकचा वापर न करता कापडी पिशवीचा वापर करा व बॅनरबाजी करून फटाके फोडुन तसेच हार बुके वापरून पर्यावरणाला धोका होईल.असे न कराता समाजोपयोगी वंचित, उपेक्षित घटक विध्यार्थी यांच्या हितासाठी वाढदिवसचा इतर खर्च टाळून व पर्यावरण पुरक वाढदिवस साजरा करण्याचे आम्ही ठरवले होते. म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत किमान एका विद्यार्थ्याला एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वाटप केले असून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची रुची निर्माण व्हावी. तसेच प्रत्येक शाळेचा परिसर नैसर्गिक दिसावा, व पर्यावरण संतुलित राहावे व पर्यावरणाच्या अनुषंगाने वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे समाजा बरोबरच निसर्गाचे देखील आपण काही देणे लागतो त्यामुळे निसर्गाचे ऋणानुबंध जपण्यासाठी पर्यावरण जपने हि काळाची गरज आहे असल्याचे मत संजय आंधळे यांनी व्यक्त केले. यावेळी उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, शिवसेना तालुकाप्रमुख माऊली गोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती अनिल चोले, अशोक गोंडे, युवक मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, डॉ. रोहिदास खोटे, सरपंच खोटे, दत्ता गोंडे, बाबुराव तवरे, शिवाजी गोंडे, गोरख गोंडे, गणेश गोंडे, संतोष शिंदे, सुंदर राठोड, बालासाहेब शिंदे, गंगाधर लोणकर, मधुकर खाडे, राजाभाऊ लोंढे, सुधाकर नागरगोजे, किशोर चाटे, देवानंद तांबडे, शालेय समिती अध्यक्ष, मायकर, अण्णासाहेब शिंदे, शरद राठोड, रामभाऊ लांडे, संतोष खाडे, व आदी भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# वडवणीच्या रेणुकामाता संस्थानात शिवमहापुराण कथा

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून करण्यात आले आहे. तर या कार्यक्रमाची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी होणार आहे. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला भगिनींसह शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समस्त वडवणी पंचक्रोशीतील भाविक भक्त व रेणुकामाता संस्थानचे प्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.





वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन येत्या दुसरा श्रावण सोमवारी म्हणजेच दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत संस्थान सभामंडपात करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शालीग्राम महाराज मते लोणीकर हे या शिवमहापुराण कथेचे प्रवक्ते असून त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबणार आहे. याप्रसंगी सिंथ वादक ह.भ.प. माऊली महाराज घुमरे, तर तबला वादक ह.भ.प.जगन्नाथ महाराज कराळे हे उपस्थित असणार आहेत. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे. यात प्रामुख्याने धन संग्रह, रागाचा त्याग, अन्नाचा त्याग, संध्याकाळ, खरं बोलणे, मोहाचा त्याग करणं, सकारात्मक कल्पनाशक्ती, प्राणी नव्हे तर माणूस बना यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरणार असून या कथेची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी भव्य महाप्रसादाने होणार आहे. दरम्यान याठिकाणी शिवमहापुराण कथेच्या आयोजनाचे हे सलग दुसरे वर्ष असून अण्णा महाराज दुटाळ यांनी गतवर्षी पहिल्यांदा आयोजित या शिवमहापुराण कथेच्या सांगतेप्रसंगी आपण यापुढील काळातही प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यात याच ठिकाणी या शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्याचे भाविकांना दिलेल्या वचनाचे त्यांनी तंतोतंत पालन केले आहे. या शिवमहापुराण कथेच्या आयोजनाची आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण झाली असून तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता भगिनींसह सर्व शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समस्त वडवणी पंचक्रोशीतील भाविक भक्त व रेणुकामाता संस्थानचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शासकीय तंत्र प्रशाला येथे द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

बीड :येथील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता द्विलक्षी अभ्यासक्रमातील ऐच्छिक विषय घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. या अंतर्गत इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्कूटर मोटर सायकल सर्व्हिसिंग व मेकानिकल मेंटेनन्स या विषयांपैकी एक विषय ऐच्छिक निवडता येतो. सदरील विषय हा एकुण २०० गुणांचा असून त्यापैकी प्रात्यक्षिक परीक्षेचे १२० गुण व थेअरी परीक्षेचे ८० गुण असतात. हे विषय इंजिनिअरींग क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून, यामुळे इयत्ता १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे शक्य आहे तसेच या इंजिनिअरींग ग्रुपच्या विषयामुळे त्यांना इंजिनिअरींगचे मुलभूत ज्ञान प्राप्त होते व त्याचे महत्व लक्षात येऊन आवड निर्माण होते.

हे विषय घेण्यासाठी बीड तालुक्यातील कोणत्याही महाविद्यालयात इयत्ता ११ वी तील प्रवेशित विद्यार्थी विहित नमुन्यात अर्ज करु शकतात. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे संपर्क साधावा.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री गणेश नाथा घोडके, पत्ता. रा.वडवणी, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं.४८ प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र.१०००/४१ साईज पु.प.३० फुट, द.ऊ.४० फुट वर अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः विठ्ठल शिंदे,, पश्चिमःघोडके, दक्षिणः रस्ता, उत्तरः काळे

दिनांक : २१/०७/२०२५

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

# शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे अटक.;बीड शहर पोलिसांची कामगिरी

बीड:दिनांक २३/०७/२०२५ रोजी सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन मुलांच्या एकमेकांमधील किरकोळ भांडणाचे कारणामुळे पाथरूड गल्लीतील काही मुलांनी शाळेमध्ये घुसून मुलास आणि मुलाच्या पालकाला मारहाण केली होती. बीड शहर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून १५ आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून घेतला होता. सीसीटीव्ही फुटेज वरून सर्व आरोपी निष्पन्न झाले आहे.

या १५ आरोपी पैकी आठ प्रमुख आरोपी यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हा दाखल केल्या पासून काही आरोपी फरार होते. त्यातील चार आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना पालकांच्या ताब्यात दिली आहे.

अटक झालेल्या आरोपींची नावे खालील प्रमाणे आहेत..

१. अनेश नरेश गायकवाड वय २५ वर्ष, २ साहिल नरेश गायकवाड व २१ वर्ष, ३. शेखर रत्नाकर जाधव वय ३१ वर्ष, आकाश पालकर जाधव वय ३९ वर्ष. सर्व राहणार पात्रुड गल्ली अशी आहेत. यातील दोघेजण हे अभिलेखावरील गुन्हेगार आहे आणि त्यांच्यावर अगोदरच मारहाणीची गुन्हे दाखल आहेत.

अशा गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी सांगितले आहे अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आरोपी अटकेबाबत सविस्तर सूचना दिल्या होत्या.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री भगवान धोंडीबा माने, पत्ता. रा.वडवणी, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. साईज पु.प.१२.१९ मी, द.ऊ.६.०९ मी वर अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा

पुर्वः ढोले फ्लॅट, पश्चिमः रस्ता, दक्षिणः सहन, उत्तरः द्वारकाबाई माने

दिनांक : २१/०७/२०२५

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२४/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. सोमनाथ पि. रावसाहेब बेंडसुरे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. अमोल पि. दिनकर आंधळे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४७८ प्लॉट क्र.०७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) प्लॅट क्र.०७ पुर्वपश्चिम ७.६० मी. दक्षिणोत्तर १२.५० मी. एकुण क्षेत्रफळ ९५ चौ.मी.

पुर्व - सदर लेआऊट मधील ओपर स्पेस

पश्चिम - प्लॉट क्र.०६

दक्षिण - प्लॉट क्र. ०८

उत्तर - ०९ मीटरचा रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

अर्जदाराचे नाव - श्री. रामधन प्रभु मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. चंद्रकांत दिगांबर जैन (जगजीवन)

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. २२१ प्लॉट क्र. ०६ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम दक्षिण बाजू १७.५० मी. उत्तर बाजू १८.८५ मी. दक्षिणोत्तर पुर्व बाजू ०९.५५ मी. पश्चिम बाजू १६.५५ मी. एकुण क्षेत्रफळ २२८.६० चौ.मी.

पुर्व - ०९ मीटर रस्ता, पश्चिम - १८ मीटर रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.०७, उत्तर - १५ मी. रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२९/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. भागीरथी मधुकर शिंदे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. महेश राजाभाऊ मुंडे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.६३७ प्लॉट क्र.६८ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) १) गट क्र.६३७ प्लॉट क्र.६८ पुर्वपश्चिम १८ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ १६४.७ चौ.मी. २) गट क्र.६३९ प्लॉट क्र. ०२ पुर्वपश्चिम ८.८५ मी. दक्षिणोत्तर ९.१५ मी. एकुण क्षेत्रफळ ८०.९७ चौ.मी.

प्लॉट क्र.६८ : पूर्व - २० फुट रस्ता, पश्चिम - महेश मुंडे, दक्षिण - विठ्ठल नामदेव मुंडे, उत्तर - प्लॉट क्र.६७

प्लॉट क्र.०२ : पुर्व : महेश मुंडे, पश्चिम : चिंचोटी रस्ता

उत्तर : विठ्ठल नामदेव मुंडे, दक्षिण :प्लॉट क्र. ०३

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. २४/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. राम आसाराम बडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. संदेश शेषेराव जगताप

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.६५७ प्लॉट क्र. ०२ प्लॉट क्र. ०३ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) प्लॉट क्र.०२ पुर्वपश्चिम १०.२५ मी. दक्षिणोत्तर १०.२५ मी. एकुण क्षेत्रफळ प्लॉट क्र.०३ पुर्वपश्चिम १०.२५ मी. दक्षिणोत्तर १०.२५ मी. एकुण क्षेत्रफळ

पूर्व - केशव लंगे,पश्चिम - बाबासाहेब शेडगे व खाडे

दक्षिण - ०६ मीटर रस्ता,उत्तर - नारायण जाधव व सिध्देश्वर मस्के

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा, मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२९/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. विजयमाला येडोबा गोरे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- ज्योती दत्तात्रय अंबुरे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५२९ प्लॉट क्र.६६ मिळकत क्र.२८०७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ०९ मीटर दक्षिणोत्तर ०६ मीटर एकुण क्षेत्रफळ ५४ चौ.मी.

पुर्व - ०९ मीटर रस्ता, पश्चिम - प्लॉट क्र.६२

दक्षिण - प्लॉट क्र, उत्तर - प्लॉट क्र.६७

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. २९/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. महारुद्र जीवन मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. मंगल महादेव मुंडे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.२२० प्लॉट क्र.३९ मिळकत क्र. ३८८४ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ११ मीटर दक्षिणोत्तर ९.१४ मीटर एकुण क्षेत्रफळ १००.५४ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र.२८,पश्चिम - २० फुट रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.३८,उत्तर - प्लॉट क्र. ४०

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२४/०७/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. विमल नवनाथ चव्हाण

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. रंजिम माणिकराव सावंत

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४६ प्लॅट क्र.६५ मिळकत क्र.४९५७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १३.७१ मीटर दक्षिणोत्तर ६.०९५ मी. एकुण क्षेत्रफळ ८३.५६ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ४९ व ५०, पश्चिम - रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.६६, उत्तर - प्लॉट क्र.६४

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.३० जुलै २०२५ । पान ४

## अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त मन जिंकणारा उपक्रम

बीड :क्रांतीशील विचारवंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. कष्टकरी आणि श्रमिक महिलांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमात तब्बल पाचशे महिलांना साडी-वाटप करण्यात आले. त्यामुळे समाजात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहरने एक आदर्श निर्माण करून दिला आहे.असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.बीड शहरात दि.२८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्य सम्राट गौरव महोत्सव साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.२८) रोजी चांदणे वाडा येथे साडी वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्ष म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर उपस्थित होत्या.

# ना.पंकजाताई मुंडेंकडून प्रा.सोमनाथराव बडे यांच्या नावाला हिरवा कंदील!

### सोमनाथ बडेंनी घेतली रामटेक वर भेट: जिल्हा परिषद निवडणूक

वडवणी:प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने डोंगरपट्ट्यातील भारतीय जनता पार्टीचे नेते प्रा.सोमनाथराव बडे यांनी नुकतीच राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांची रामटेक येथील त्यांचा निवासस्थानी भेट घेऊन जिल्हा परिषद निवडणुकीसंदर्भात इच्छा व्यक्त केली. ना. पंकजाताई मुंडे यांनी देखील हिरवा कंदील दाखवण्याचे माहिती सुत्रांनी दिली आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की,सध्याच्या जमान्यात 'बळी तो कान पिळी' या म्हणी प्रमाणे वागणाराच पुढे येत असतो. बोलणाऱ्याच्या रेवढ्या खपत्यात पण न बोलणाऱ्याचा पेढा सुद्धा खपत नाही. आपला दर्जा समाजापुढे मांडण्याचे कौशल्य नसेल तर तो दर्जा शोधत येण्यास समाजाला

फार वेळ लागतो. कदाचित तोपर्यंत आपले कौशल्य टाकाऊ झालेले असते. गुणी माणसे या एका गुणामुळे मागे पडतात. तर अर्ध्या हळकुंडाने पिवळी झालेली माणसे आपण सोने असल्याचा आभास निर्माण करतात. हेच चित्र आता पर्यंतच्या वडवणी



तालुक्यातील भाजप अंतर्गत राजकारणात होत होते. परंतु आता चित्र बदलले आहे. भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांनी रामटेक येथे आलेल्या भाजपचे नेते प्रा.सोमनाथराव बडे यांना आवर्जून भेट देत सविस्तर चर्चा केली. या भेटीत प्रा.सोमनाथराव बडे यांनी

गेल्या वीस वर्षा पासून आपण मुंडे घराण्याच्या प्रती असलेल्या निष्ठेचा दाखला देत ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली चिखलबीड जिल्हा परिषद गटातुन आपण निवडणूक लढवण्याची ईच्छा बोलून दाखवली. ना पंकजाताई मुंडे यांनी सुद्धा प्रा.सोमनाथराव बडे यांनी व्यक्त केलेल्या ईच्छेला हिरवा कंदील दाखवला असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. राजकारणाचे अंदाज वर्तवणे महाकठीण तर आहेच.

त्यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत चिखलबीड जिल्हा परिषद गटातील उमेदवारीच्या निमित्ताने ना.पंकजाताई मुंडे या प्रा.सोमनाथराव बडे यांनी व्यक्त केलेल्या उमेदवारीला न्याय देतात का.? याचं उत्तर लवकरच समजणार आहे.

# तानाजी आजबे यांचे दु:खद निधन

### शोकाकुल वातावरणात दिला अखेरचा निरोप

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी पंचायत समिती कार्यालयातील नरेगा विभागाचे अभियंता तानाजी बळीराम आजबे वय ४२ वर्षे यांचं पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झालं. रविवारी सकाळी त्यांच्या चिंचाळा या मूळ गावी शेतात शोकाकुल वातावरणात हजारोंच्या उपस्थितीमध्ये त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. या घटनेमुळे चिंचाळ्यासह वडवणी तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. श्री. तानाजी बळीराम आजबे हे उच्च शिक्षित संयमी, कर्तव्यदक्ष, सुसंस्कारित व्यक्तिमत्व म्हणून सर्व परिस्थितीत होते. कर्तव्यात कार्यनिष्ठा आणि सुस्पष्ट कारभार तसेच आपुलकी पणाचे अधिकारी म्हणून त्यांचा वडवणी पंचायत समिती कार्यालयातील कारभार होता. यामुळे मित्रपरिवार देखील त्यांना मोठ्या प्रमाणात लाभला होता. तानाजी आजबे हे गेल्या अनेक दिवसापासून आजारी होते.त्यांच्यावर पुणे येथील एका नामांकित खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार देखील सुरू होते. परंतु काही दिवसांपासून शरीर उपचाराला साथ देत नसल्यामुळे प्रकृती हालाखीची बनली होती. यात शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास तानाजी आजबे यांनी पुणे येथील रुग्णालयातच अखेरचा श्वास



घेतला. रविवारी त्यांच्या मूळ गावी चिंचाळा तालुका वडवणी या ठिकाणी सकाळी नऊ वाजता हजारोंच्या उपस्थितीमध्ये शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. ही वार्ता रात्री सोशल मीडियाच्या माध्यमातून वाऱ्यासारखी पसरली. त्यावेळी त्यांच्या संपर्कात असणारा मित्रपरिवार सह ग्रामस्थ व वडवणी तालुक्यातील एक कर्तव्यदक्ष कार्यनिष्ठ शांत संयमी आणि उच्चशिक्षित अधिकारी काळाच्या पडद्याआड गेल्याने प्रत्येक जण हळूहळू व्यक्त करत होते. तर तानाजी आजबे हे वडवणी पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम आजबे यांचे चिरंजीव होते. तानाजी आजबे यांच्या पश्चात आई,वडील,भाऊ, भावजई,चुलते, चुलत्यांसह, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे. आजबे यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात डोंगरचा राजा परिवार सहभागी आहे.

# काँग्रेस तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी समितीची केली निवड

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदी नुकतीच ज्ञानदेव आंधळे यांची फेरनिवड झाल्यानंतर त्यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक सामोरे ठेवून वडवणी तालुका काँग्रेस कमिटीची सर्वसमावेशक कार्यकारीणी जाहीर केली असून यामध्ये काँग्रेस पक्षाची विचारधारा तसेच सर्व समावेशक व एक निष्ठेला संधी दिली आहे.

वडवणी तालुका राष्ट्रीय काँग्रेस पार्टीची सोमवार रोजी काँग्रेस भवन वडवणी येथे बैठक संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने व अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सदस्या व हिमाचल प्रदेशच्या प्रभारी खा. सौ. रजनीताई अशोकराव पाटील, माजी.मंत्री



अशोकराव पाटील , जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या आदेशाने वडवणी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी तालुका काँग्रेस कार्यकारिणी जाहीर केली आहे.

यामध्ये तालुका उपाध्यक्षपदी पांडुरंग मस्के, शिवाजी शिंदे, धनराज रामकिसन मुंडे, भास्कर सावंत सचिवपदी मुबीन पठाण, बाबासाहेब झोडगे,

तानाजी माळी, तर सरचिटणीसपदी गणेश आडे, विष्णू उजगरे, ओम खळगे व चिटणीसपदी शकील शेख, दादासाहेब बर्डे, लक्ष्मण कोठुळे, खजिनदार : सुरेश उजगरे तसेच जिल्हा परिषद गट अध्यक्ष म्हणून परमेश्वर मुंडे, संजय राठोड यांच्या निवडी करुन वडवणी तालुका काँग्रेस कार्यकारिणी मध्ये त्यांना समाविष्ट करण्यात आले असल्याचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी जाहीर केले.

# मानवी हक्क अभियानचा वडवणी तालुक्यात झंझावात

### तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले आगे बढो हम तुम्हारे साथ है.! घोषणाबाजी

वडवणी :प्रतिनिधी

मानवी हक्क अभियानचा वडवणी तालुक्यात झंझावात सुरू झाला असुन गावोगावी शाखा उभारण्यात येत आहेत.

तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले यांनी याकामी पुढाकार घेतला असून त्यात त्यांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कार्यकर्त्यांमध्ये सुध्दा नवचैतन्य निर्माण झाले असून तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले आगे बढो हम तुम्हारे साथ है.! अशा घोषणाबाजीने जोशपुर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील मानवी हक्क अभियान संघटनेच्या शाखा करण्यासाठी युद्ध पातळीवर यंत्रणा राबविली जात आहे. तालुक्यातील रुई पिपळा,लोनवळ तांडा, उपळी येथे मानवी हक्क अभियान चे तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले यांच्या हस्ते मानवी हक्क अभियानाच्या शाखेचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. या शाखा ओपनिंग प्रसंगी मानवी हक्क अभियानाचे जिल्हा सचिव आप्पाराव मुजमुले, ऊसतोड मजूर तालुका अध्यक्ष बप्पासाहेब पाटोळे, उपाध्यक्ष पाटोळे भाऊ,मा.ह.अ.बालाजी इचके,महिला आघाडी तालुका अध्यक्ष सागरबाई इचके, लहू इचके, युवा नेता बंडू मुजमुले, शहराध्यक्ष उद्धव आव्हाड, विद्यार्थी आघाडीचे प्रदीप आवाड, मानवी हक्क अभियान सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष आदर्श मुजमुले तसेच सर्व तालुका कार्यकर्ते व पदाधिकारी, उपस्थित होते.












हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)